आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१२ मे २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- सहकार कायद्यात काळानुरूप बदल करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

- देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी, राज्यात ठीकठिकाणी बुद्ध वंदना, धम्म रॅली, सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज रात्री आठ वाजता देशवासियांशी संवाद साधणार

- राज्य शिक्षण मंडळानं घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा उद्या निकाल

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे सुमारे ३ हजार, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत ९१७ अंकांची वाढ

<><><><><>

सहकार कायद्यात काळानुरूप बदल करण्यासाठी समिती स्थापन करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. ते मुंबईत, सहकाराचं सक्षमीकरण आणि शासनाचं धोरण या विषयावर आयोजित परिसंवादात बोलत होते. सहकार चळवळीचं सिंहावलोकन करुन त्या माध्यमातून ग्रामीण अर्थकारण अधिक प्रगतिशील करण्यासाठी आणि सामान्य शेतकऱ्यालाही यात जोडून घेण्यासाठी राज्यसरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्य सरकारनं केंद्र सरकारच्या सहाय्यानं राज्यात स्मार्ट आणि ॲग्री बिझनेस प्रकल्प सुरु केले असून दहा हजार गावांमधल्या प्राथमिक कृषी पतसंस्थांना प्रशिक्षण दिलं जात आहे, शिवाय त्यांना आर्थिक मदत देखील दिली

जात आहे, जागतिक बँकेनं या प्रकल्पांचा अभ्यास करुन त्याविषयी समाधान व्यक्त केलं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी केली जात आहे. बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार या देशांमधून लाखो अनुयायी बुद्धजयंतीनिमित्त दाखल झालेत. यानिमित्तानं  महाबोधी विहारात विशेष प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. सत्य, समानता आणि सौहार्द या तत्वांवर आधारित भगवान बुद्धांची शिकवण मानवतेसाठी मार्गदर्शक असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

राज्यात विविध ठिकाणी बुद्धपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. **नाशिकमध्ये** बुद्ध स्मारक इथं धम्म ध्वजारोहण, बुद्ध वंदना आणि बोधी वृक्ष वंदनेसह विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. **परभणी** जिल्ह्यात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीनं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पंचशील ध्वज फडकवण्यात आला. तर **नागपूर** जिल्ह्यात कामटी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल इथंही आज विशेष बुद्ध वंदना आयोजित करण्यात आली होती. याशिवाय नागपूरमध्ये बुद्ध जयंतीनिमित्त मोफत मोतीबिंदू तपासणी आणि नेत्र शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. २०० हुन अधिक लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला. **कोल्हापुरात** विविध सामाजिक शैक्षणिक संस्था संघटनांनी भगवान बुद्धांच्या मूर्ती आणि प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. तर **बीड** जिल्ह्यात अंबाजोगाई शहरासह ठिकठिकाणी धम्म रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज रात्री आठ वाजता देशवासियांना संबोधित करणार आहेत. पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या तसंच ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर हे संबोधन असेल.

तत्पूर्वी आज प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथे उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख आणि अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

पाकिस्तानी सैन्यानं दहशतवाद्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला, त्याचा प्रतिकार करणं भारताला भाग पडलं, त्यामुळे पाकिस्तानच्या नुकसानीसाठी ते स्वतःच जबाबदार आहेत, असं हवाई दल मोहिमा महासंचालक एअर मार्शल ए के भारती यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्ली इथं तिन्ही संरक्षण दलाच्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. भारताची लढाई ही पाकिस्तानी लष्कर किंवा नागरिकांशी नसून दहशतवाद्यांशी होती, असं त्यांनी स्पष्ट केलं.

भारताची सुरक्षा व्यवस्था अभेद्य होती, ती भेदणं पाकिस्तानला अशक्य होतं, असं भारती म्हणाले. आकाश या हवाई संरक्षण प्रणालीच्या कामगिरीचा त्यांनी विशेष उल्लेख केला. भारतानं पाकिस्तानच्या नूर खान एअरबस आणि रहीम यार खान एअरबसचा अचूक वेध घेतल्याचं भारती यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय सैन्यानं ज्या ताकदीनं आणि अचूकतेनं ऑपरेशन सिंदूर राबवलं ते अभूतपूर्व असून राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयानं काम करेल, असं मुखमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांची संयुक्त बैठक आज वर्षा या निवासस्थानी झाली त्यावेळी ते बोलत होते. तंत्रज्ञानाचा

अधिक वापर आणि यापुढे घेण्याच्या खबरदारीबद्दल, तसंच संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतिमान समन्वय यंत्रणा उभारण्यावर बैठकीत चर्चा झाली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या, इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल, उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे, असं मंडळाच्या अधिकृत पत्रकात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे विषयनिहाय गुण, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

**<><><><><>**

भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्यानंतर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज २ हजार ९७५ अंकाची वाढ नोंदवत ८२ हजार ४३० अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ९१७ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ९२५ अंकांवर बंद झाला.

ही चालू वर्षातली आतापर्यंतची सर्वोच्च वाढ आहे. परकीय गुंतवणूकदारांनी केलेली गुंतवणूक आणि जागतिक पातळीवरचे सकारात्मक संकेत यांमुळे ही वाढ दिसून आल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत ८२ पदकांची लयलूट करत महाराष्ट्रानं पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ३२ सुवर्ण आणि २५ रौप्य आणि २५ कांस्यपदकांचा समावेश आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्र पदकतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. कर्नाटक ४३ पदकांसह दुसऱ्या तर राजस्थान २६ पदकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

क्रिकेटपटू विराट कोहलीने आज कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यानं समाज माध्यमावर ही माहिती दिली आहे. विराटनं त्याच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत आत्तापर्यंत १२३ सामन्यांमध्ये ४६ पूर्णांक ८५ शतांशच्या सरासरीनं ९ हजार २३० धावा केल्या आहेत. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांच्यानंतर विराट हा भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाज बनला. कसोटी कर्णधारपदाच्या पदार्पणात ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू ग्रेग चॅपल याच्यानंतर दुहेरी शतक करणारा विराट कोहली दुसरा क्रिकेटपटू आहे. कोहलीच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये भारतीय संघानं ऑस्ट्रेलियामध्ये पहिल्यांदा बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिका जिंकली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड जिल्ह्याच्या सीमेवर पोलीस आणि नक्षलवाद्यांमधे आज चकमक झाली. या चकमकीत काही नक्षलवादी ठार आणि जखमी  झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातल्या मुल तालुक्यात भादुर्णी इथं आज सकाळी तेंदुपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या महिलेवर वाघानं हल्ला केल्यामुळे ती जागीच ठार झाली. जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात गेल्या दोन दिवसात पाच महिलांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

राज्यात आज विविध ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली. **बीड** शहरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. पावसामुळे, पाेलिसांसाठी नव्यानं बांधलेल्या इमातीतल्या घरांच्या खिडक्या निखळल्या. **जालना** शहरासह जिल्ह्यातही हलक्या स्वरुपाचा पाऊस पडला. **कोल्हापूर** शहर आणि जिल्ह्यातही आज दुपारच्या सुमाराला अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या.

**नाशिक** शहराला सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसानं झोडपून काढलं. त्यामुळे अनेक भागात पाणी साचलं तर मोठ्या प्रमाणात वृक्ष उन्मळून पडल्यानं वीज पुरवठाही काही काळ खंडीत झाला. अवकाळी पावसामुळे झाड अंगावर पडल्यानं नाशिकमध्ये आज एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला तर काल एका युवतीचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला. कृषी विभागानं दिलेल्या माहितीनुसार नाशिक जिल्ह्यातल्या ६०० गावांमधल्या १४ हजार ६१३ शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला आहे.

**नंदुरबार** जिल्ह्यात सातपुडा पर्वतरांगांसह अनेक ठिकाणी आज दमदार पावसानं हजेरी लावली. **सोलापूर** जिल्ह्यात पडलेल्या पावसानं तापमानात मोठी घट झाली आहे. **लातूर** शहर आणि परिसरातही आज सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पावसानं हजेरी लावली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय घट, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर कोकण, राठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**